Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 11 February 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

**दिनांक: ११ फेब्रुवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य रा रं बोराडे यांचं आज छत्रपती संभाजीनगर इथं वृद्धापकाळाने निधन झालं, ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्यावर गेल्या काही दिवसांपासून एमजीएम रुग्णालयात उपचार सुरु होते.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वैजापूर इथल्या महाविद्यालयात प्राध्यापक आणि नंतर परभणी इथल्या शिवाजी महाविद्यालयात प्राचार्य पदाची जबाबदारी सांभाळलेले बोराडे यांचा 'पेरणी' हा पहिला कथासंग्रह १९६२ साली पुण्याच्या कॉन्टिनेन्टल प्रकाशनाने प्रसिद्ध केला होता. त्यांची 'पाचोळा' ही कादंबरी विशेष गाजली. याशिवाय 'तलफ', 'बुरूज', यांसारख्या अत्यंत वेगळ्या धाटणीच्या कथाही त्यांनी लिहिल्या होत्या. ग्रामीण भागातल्या गरीब सर्वसामान्य माणसाला त्यांनी आपल्या कथांमधून जिवंत केलं. त्यांच्या कथांमधली पात्रं ठसठशीतपणे वाचकांच्या समोर येतात. त्यांच्या कादंबऱ्यांवरचे चित्रपटही प्रसिद्ध झाले आहेत.

पाचोळा या कादंबरीसाठी तसंच मळणी या कथासंग्रहासाठी महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा पुरस्कार देऊन त्यांना गौरवण्यात आलं होतं. गेल्या आठवड्यात राज्य शासनाने विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार ही बोराडे यांना जाहीर केला होता. बोराडे यांच्या पार्थिव देहावर आज संध्याकाळी छत्रपती संभाजीनगर इथं अंत्यसंस्कार होणार आहेत.

****

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीनं घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या परीक्षेला आजपासून सुरुवात झाली. या परीक्षेसाठी १५ लाख पाच हजार ३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असल्याची माहिती मंडळानं दिली आहे. राज्यभरातल्या तीन हजार ३७३ मुख्य केंद्रावर परीक्षा होत आहे. परीक्षा काळात संभाव्य गैरप्रकारांना आळा बसावा, या दृष्टीने मंडळानं २७१ भरारी पथकांची

नेमणूक केली आहे. परीक्षेदरम्यान कॉपीमुक्त अभियान राबवण्यात येणार असून, या अंतर्गत राज्यातल्या संवेदनशील परीक्षा केंद्रांवर ड्रोन कॅमेऱ्याने निगराणी ठेवली जाणार आहे. तसंच, परीक्षा केंद्राच्या बाहेर जिल्हा प्रशासनामार्फत व्हिडीओ चित्रीकरण करण्यात येणार आहे.

****

आजच्या आधुनिक जगात मनुष्य एकीकडे प्रगती करत असताना दुसरीकडे तो वैयक्तिक आणि भावनिक स्तरावर अशांत होत आहे; अशावेळी ब्रह्मकुमारी संस्थेच्या भगिनींचं समाजात प्रेमभावना, शांतता आणि सद्भावना प्रसाराचं कार्य अतिशय प्रशंसनीय आहे, असं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. ब्रह्मकुमारी संस्थेच्या वैश्विक संस्कृती, प्रेम, शांतता आणि सद्भावना अभियानाचं उद्घाटन राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत काल मुंबईत राजभवन इथं झालं, त्यावेळी ते बोलत होते.

****

अलमट्टी धरणाची उंची वाढवण्याच्या निर्णयाला महाराष्ट्रासह कोणत्याही राज्यानं विरोध केलेला नाही, असं केंद्रीय जलशक्तीमंत्री सी आर पाटील यांनी काल लोकसभेत सांगितलं. खासदार विशाल पाटील यांनी याबाबत तारांकित प्रश्न उपरस्थित केला होता. धरणाची उंची वाढवण्याचा निर्णय कर्नाटक सरकारनं घेतला, त्याला कृष्णा पाणी लवादानं मंजुरी दिली. या प्रश्नावर कोणत्याही राज्याकडून धरणाची उंची वाढवायला विरोध असल्याचा प्रस्ताव दाखल झालेला नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं.

कर्नाटक सरकारनं अलमट्टी धरणाची उंची पाच मीटरनं वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या धरणाचं पाणी शिरोळ तालुक्यापर्यंत पोहोचणार असून, पावसाळ्यात सांगली आणि कोल्हापूर हे दोन्ही जिल्हे जलमय होऊ शकतात, असा दावा जलतज्ज्ञांनी यापूर्वी केला आहे.

****

प्रधानमंत्री उज्ज्वला योजना २०१६ ला सुरू झाल्यापासून आतापर्यंत लाभार्थ्यांना १० कोटी एलपीजी जोडण्या दिल्या आहेत, अशी माहिती केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी राज्यसभेत दिली. एलपीजी जोडणीसाठी अजून २९ लाख अर्ज प्रलंबित असून, ते मंजूर करण्यासाठी कोणतीही कालमर्यादा निश्चित केलेली नाही असं त्यांनी सांगितलं.

****

रेल्वे वाहतुकीसाठी विजेची वाढती गरज लक्षात घेऊन त्याच्या पुरवठ्यासाठी आता अणुऊर्जेच्या पर्यायाचा वापर करण्यात येणार आहे, अशी माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल राज्यसभेत दिली. त्यासाठी रेल्वे मंत्रालयाने न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन इंडिया लिमिटेड आणि वीज मंत्रालयाशी संपर्क साधला असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने धाराशिव इथं काल मध्यवर्ती शिवजयंती महोत्सवाची ध्वजारोहणाने सुरुवात झाली. पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यावेळी उपस्थित होते. १९ तारखेपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

परभणी जिल्ह्यातल्या गंगाखेड शहराला वीज पुरवठा करणाऱ्या महावितरण कार्यालयाजवळच्या रोहित्राला काल आग लागली होती. नागरिकांची सतर्कता तसंच पोलीस, आणि अग्निशमन दलाच्या प्रयत्नांमुळे ही आग आटोक्यात आली.

****